मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# येशू आंधळ्याला बरे करतो



लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Janie Forest
रूपान्तरकार: Ruth Klassen
अनुवादक: Rev. Shilas Gavit
निर्माता: Bible for Children
www.M1914.org

BFC
PO Box 3
Winnipeg, MB R3C 2G1
Canada

©2015 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत,
तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

बार्तीमय नावाचा एक आंधळा मनुष्य होता, तो यरिहोला जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला बसून भिक मागत असे. त्या रस्त्याने जाणारे काही दयाळू वृत्तीची माणसे त्याला थोडेसे पैसे किंवा खाण्यासाठी काही देत असत. बार्तीमयला दृष्टी नसल्यामुळे काम करु शकत नव्हता. तो केवळ भिक मागू शकत होता.



एके दिवशी, रस्ता फारच व्यस्त होता. बार्तीमयने चालतांना पुष्कळ लोकांच्या पायाचा आवाज ऐकला. दररोज न घडणारे काहीतरी घडत होते. लवकरच तो आवाज काय आहे हे त्या आंधळ्याला कळले. नासरेथकर येशू त्या गावात आला होता. येशूला पाहण्यासाठी व त्याचे ऐकण्यासाठी लोकांनी गर्दी केली होती.





"येशू, दाविदाच्या पुत्रा, माझ्यावर दया करा !" असे बार्तीमय का ओरडू लागला? येशू त्याला मदत करेल असे त्याला का वाटले असावे? येशूने इतरांना बरे केले; काही बहिरे होते, काही मुके होते, काही लुळे–पांगळे होते, तर काही त्याच्यासारखे आंधळे होते, त्यांच्याविषयी कदाचित त्याने ऐकले असावे. "दाविदाच्या पुत्रा, माझ्यावर दया करा" असे बार्तीमय परत आणि परत ओरडत होता. त्याच्या आवाजात आशेचा ध्वनी होता.



बार्तीमयला एका गोष्टीची खात्री होती. जर त्याला आता मदत मिळाली नाही तर कदाचित त्याला दुसरी संधी मिळणार नव्हती. त्या रस्त्याने येशू कदाचित पुन्हा जाणारच नव्हते.



बार्तीमयला येशू पर्यंत पोचणे आवश्यक होते. परंतू लोक त्याला पुढे जाण्यासाठी जागा देत नव्हते. ते म्हणाले, "हश्ऽऽऽऽऽ!" त्याने गप्प राहावे म्हणून त्यांनी त्याला ताकीद दिली.



परंतू बार्तीमय गप्प राहिला नाही. तो न थांबता ओरडत राहिला. अचानक येशू थांबला ! त्याने ऐकले ! त्या आंधळ्याला त्याच्याकडे आणण्याची त्याने आज्ञा केली. तेंव्हा लोक बार्तीमयला म्हणाले, "धीर धर, उठ, तो तुला बोलावीत आहे."



तेंव्हा तो आपले वस्त्रे टाकून उठला व येशूकडे आला.



येशूने त्याला विचारले, "मी तुझ्यासाठी काय करावे अशी तुझी इच्छा आहे?" तुम्ही काय उत्तर दिले असते. तुम्ही खूप पैसा आणि चांगले कपडे मागितले असते का? बार्तीमयला देखिल हेच हवे होते का?



नाही, आंधळ्या बार्तीमयने येशूकडे सोने किंवा चांगले कपडे मागितले नाही. त्याला काय हवे होते हे तुम्हांला माहित आहे.



"प्रभू, मला दृष्टि प्राप्त व्हावी." बार्तीमयला पाहायचे होते. त्याला झाडे आणि पक्षी आणि देवाने बनवलेली सुंदर सृष्टी पाहायची होती. तो पाहू इच्छित होता यासाठी की तो स्वतःची काळजी स्वतः घेऊ शकेल आणि भिकारी बनून राहणार नाही.



मग येशूने बार्तीमयला म्हटले, "तुला दृष्टि प्राप्त होवो, तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे."



तत्क्षणी त्याला दृष्टि प्राप्त झाली, आणि तो येशूच्या मागे चालू लागला. "परमेश्वर अद्भुत आहे ! त्याने मला बरे केले !" ऐवढेच तो म्हणाला.



सर्व लोकांनी जेंव्हा हे पाहिले,
तेंव्हा त्यांनी देवाची स्तुति केली.
पुन्हा एकदा देवाच्या पुत्राच्या
सामर्थ्याचे चिन्ह त्यांनी पाहिले
होते, येशूने एका गरिब
भिकाऱ्याला दृष्टि दिली.



येशू आंधळ्याला बरे करतो

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

मार्क १०, लूक १८, योहान ९

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16